नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २५/०८/२०२६ (मंगळवार )**

.........................................................................................

## मा. वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी पोलीस अधिकारी आणि अंमलदार यांच्यासाठी घेतली " सर्व कर्मचारी संवाद बैठक" ( All Hands Meet)

आज दिनांक २५/०८/२०२६ रोजी पोलीस भवन, नागपुर येथे मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी पोलीस अधीक्षक कार्यालय, तसेच पोलीस मुख्यालय, नागपुर ग्रामीण जिल्हा येथील पोलीस अधिकारी, अंमलदार आणि मंत्रालयीन स्टाफ यांची **" सर्व कर्मचारी संवाद बैठक " (All Hands Meet) घेतली** . उपस्थित पोलीस अधिकारी/अंमलदार यांच्या अडीअडचणी, कामकाजासंदर्भातील विविध मुद्दे तसेच नवनविन कल्पना या विषयांवर चर्चा करण्यात आली. **सदर बैठकीदरम्यान विविध शाखांच्या कामकाजाचा आढावा घेताना कामकाज अधिक गतिमान व कार्यक्षम करण्यासाठी आवश्यक त्या शाखांना संगणक व स्कॅनर उपलब्ध करून देण्याबाबत आदेश देण्यात आले. याशिवाय विविध शाखा व कार्यालयांच्या कामकाजानुसार आवश्यक असलेल्या मनुष्यबळाबाबत चर्चा करून मनुष्यबळ वाढ करण्याचे आदेश करण्यात आले. मा. वरिष्ठ पोलीस अधीक्षक यांनी अधिकारी व अंमलदारांच्या सूचना गांभीर्याने ऐकून घेत, पोलीस दलाच्या दैनंदिन कामकाजातील अडचणी दूर करून उपलब्ध संसाधनांचा प्रभावी वापर, तसेच कार्यक्षमता वाढविण्याबाबत मार्गदर्शन केले.**

सदर बैठकीत पोलीस दलातील विविध पदावरील अधिकारी/अंमलदार यांच्या अनुभवाचा उपयोग करून पोलीस दलातील कामकाजात येणाऱ्या अडचणींवर उपाय शोधणे, पोलीस दलाची कार्यक्षमता वाढविणे, शिस्त व समन्वय राखणे याबाबत चर्चा करण्यात आली. **सदर सर्व कर्मचारी संवाद बैठकीस श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक,**

नागपुर ग्रामीण जिल्हा, श्रीमती पुजा गायकवाड,पोलीस उपअधिक्षक (गृह),तसेच सर्व शाखेचे प्रभारी अधिकारी, अंमलदार आणि पोलीस मुख्यालय येथील अधिकारी आणि अंमलदार उपस्थित होते.





# आगामी गणेशोत्सव व ईद–ए–मिलादच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी नागपूर ग्रामीण पोलिसांचा रूट मार्च व दंगा नियंत्रण योजनेची रंगीत तालीम

**मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात दिनांक २५/०८/२०२६ रोजी आगामी गणेशोत्सव व ईद–ए–मिलाद सणोत्सवाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी तसेच कोणत्याही अनुचित परिस्थितीचा प्रभावीपणे सामना करण्याच्या दृष्टीने नागपूर ग्रामीण पोलीसांकडून जिल्ह्यातील विविध पोलीस स्टेशनच्या हद्दीत रूट मार्च व दंगा नियंत्रणाची रंगीत तालीम घेण्यात आली.**

**पोलीस स्टेशन सावनेर**:— श्री सागर खर्डे, सहायक पोलीस अधीक्ष तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर यांच्या नेतृत्वात पोलीस निरीक्षक श्रीमती ऋतुजा जाधव , प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन सावनेर यांच्यासह सावनेर पोलीस स्टेशन येथील अधिकारी आणि अंमलदार यांनी सावनेर शहरातील प्रमुख रस्ते, बाजारपेठ, महत्त्वाची ठिकाणे व संवेदनशील परिसरातून रूट मार्च काढला.तसेच दंगा नियंत्रण योजनांचा सराव घेण्यात आला.

**पोलीस स्टेशन उमरेड**:— श्री मयंक माधव, सहायक पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, उमरेड यांच्या नेतृत्वात पोलीस निरीक्षक धनाजी जळक, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन उमरेड यांच्यासह उमरेड पोलीस स्टेशन येथील अधिकारी अंमलदार यांनी उमरेड शहरातील प्रमुख रस्ते, बाजारपेठ, महत्त्वाची ठिकाणे व संवेदनशील परिसरातून रूट मार्च काढला.तसेच दंगा नियंत्रण योजनांचा सराव घेण्यात आला.

**पोलीस स्टेशन कुही** :— पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन कुही यांच्या नेतृत्वात कुही पोलीस स्टेशन येथील अधिकारी अंमलदार यांनी कुही शहरातील प्रमुख रस्ते, बाजारपेठ, महत्त्वाची ठिकाणे व संवेदनशील परिसरातून रूट मार्च काढला.तसेच दंगा नियंत्रण योजनांचा सराव घेण्यात आला.

**पोलीस स्टेशन वेलतुर** :— पोलीस निरीक्षक प्रशांत काळे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन वेलतुर यांच्या नेतृत्वात वेलतुर पोलीस स्टेशन येथील अधिकारी, अंमलदार आणि होमगार्ड यांनी वेलतुर शहरातील प्रमुख रस्ते, बाजारपेठ, महत्त्वाची ठिकाणे व संवेदनशील परिसरातून रूट मार्च काढला.तसेच दंगा नियंत्रण योजनांचा सराव घेण्यात आला.

**पोलीस स्टेशन भिवापुर** :— सहा पोलीस निरीक्षक रविंद्र मस्कर, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन भिवापुर यांच्या नेतृत्वात भिवापुर पोलीस स्टेशन येथील अधिकारी अंमलदार आणि होमगार्ड यांनी शहरातील प्रमुख रस्ते, बाजारपेठ, महत्त्वाची ठिकाणे व संवेदनशील परिसरातून रूट मार्च काढला.तसेच दंगा नियंत्रण योजनांचा सराव घेण्यात आला.

**पोलीस स्टेशन बुटीबोरी**:— पोलीस निरीक्षक निशांत मेश्राम, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन बुटीबोरी यांच्या नेतृत्वात बुटीबोरी पोलीस स्टेशन येथील अधिकारी अंमलदार आणि होमगार्ड यांनी बुटीबोरी शहरातील प्रमुख रस्ते, बाजारपेठ, महत्त्वाची ठिकाणे व संवेदनशील परिसरातून रूट मार्च काढला.तसेच दंगा नियंत्रण योजनांचा सराव घेण्यात आला.

**पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी** :— सहा पोलीस निरीक्षक प्रशांत भोयर, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी यांच्या नेतृत्वात एमआयडीसी बोरी पोलीस स्टेशन येथील अधिकारी अंमलदार यांनी एमआयडीसी बोरी हद्दीतील प्रमुख रस्ते, बाजारपेठ, महत्त्वाची ठिकाणे व संवेदनशील परिसरातून रूट मार्च काढला.तसेच दंगा नियंत्रण योजनांचा सराव घेण्यात आला.

**पोलीस स्टेशन मौदा**:— पोलीस निरीक्षक सारिन दुर्गे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन मौदा यांच्या नेतृत्वात मौदा पोलीस स्टेशन येथील अधिकारी अंमलदार आणि होमगार्ड यांनी मौदा शहरातील प्रमुख रस्ते, बाजारपेठ, महत्त्वाची ठिकाणे व संवेदनशील परिसरातून रूट मार्च काढला.तसेच दंगा नियंत्रण योजनांचा सराव घेण्यात आला.

**पोलीस स्टेशन कन्हान** :— पोलीस निरीक्षक वैजयंती मांडवधरे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन कन्हान यांच्या नेतृत्वात कन्हान पोलीस स्टेशन येथील अधिकारी अंमलदार आणि होमगार्ड यांनी कन्हान शहरातील प्रमुख रस्ते, बाजारपेठ, महत्त्वाची ठिकाणे व संवेदनशील परिसरातून रूट मार्च काढला.तसेच दंगा नियंत्रण योजनांचा सराव घेण्यात आला.

**पोलीस स्टेशन वडोदा** :— सहा पोलीस निरीक्षक मनोज गदादे प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन वडोदा यांच्या नेतृत्वात वडोदा पोलीस स्टेशन येथील अधिकारी अंमलदार यांनी शहरातील प्रमुख रस्ते, बाजारपेठ, महत्त्वाची ठिकाणे व संवेदनशील परिसरातून रूट मार्च काढला.तसेच दंगा नियंत्रण योजनांचा सराव घेण्यात आला.

**आगामी गणेशोत्सव व ईद—ए—मिलाद सणोत्सव शांततेत, सुरक्षित व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडावा, यासाठी नागपूर ग्रामीण पोलीस दल सज्ज असून, नागरिकांनीही**

सणोत्सव शांततेत साजरा करून कायदा व सुव्यवस्था अबाधित राखावी असे आवाहन नागपूर ग्रामीण पोलीसांकडून करण्यात आले आहे.






टाहुल मेडिकल






SUYASH MOBILES
सुयश मोबाईल्स
By bickvicof5


माऊली
zeel


भावेश हेअर स्टाईल
9823127873
7972535609
9370945738
पाटील

## शासकीय कामकाजात अडथळा निर्माण करणाऱ्या आरोपीस मा. न्यायालयाने सुनावली शिक्षा

**पोलीस स्टेशन सावनेर** :— पोलीस स्टेशन सावनेर येथे अप. क्र. १६५/२०२४ कलम ३५३, १८६, २९४ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद झालेला होता.

सदर गुन्हयाची हकीकत याप्रमाणे आहे की, यातील दि. १४/०२/२०२४ रोजी फिर्यादी सरकारतर्फे सपोनि मंगला मोकाशे पास्टे सावनेर हे आपल्या कक्षात लेखनिक सोबत गुन्हयातील साक्षीदारांचे आपले लॅपटॉपवर बयान घेत असता महिला आरोपी ही फिर्यादीचे कक्षात आली व हातात मोबाईल घेवुन फिर्यादीची रेकॉर्डींग करत फिर्यादी शासकीय काम करीत असताना त्यांना अश्लील शिवीगाळ करून लॅपटॉप आपटण्याचा प्रयत्न करून फिर्यादीच्या शासकीय कामकाजात अडथळा निर्माण केला.

**तपासी अधिकारी श्री व्यंकटेश दोनोडे, पोलीस उपनिरीक्षक यांनी सदर प्रकरणाचा सखोल तपास करून आरोपी विरूध्द सबळ पुराव्यानिशी दोषारोपत्र मा. न्यायालयात दाखल केले. दिनांक २४/०८/२०२६ रोजी मा. जिल्हा व सत्र न्यायधीश क्रं २०, श्री पी.एस. पांडे यांनी नमुद महिला आरोपी कलम १८६ भादवि मध्ये ५००/— रूपये दंड , दंड न भरल्यास ०७ दिवस साधा कारावास अशी शिक्षा सुनावली आहे.**

सरकारचे वतीने ए.पी.पी. श्रीमती दिपीका गवळी यांनी काम पाहीले. सदर खटल्याच्या सुनावली दरम्यान श्री. सागर खर्डे उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर उपविभाग, पोलीस निरीक्षक श्री. ऋतुजा जाधव प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन सावनेर, पोलीस निरीक्षक श्री विशाल गिरी, दोषसिध्दी कक्ष, नागपुर ग्रामीण, सपोनि श्री विशांत नांदगाये, सफौ श्री मनोज तिवारी, ब.नं १६४१, नेम. दोषसिध्दी कक्ष, नागपुर ग्रामीण यांनी महत्वपुर्ण योगदान दिले. कोर्ट कामात पैरवी पोहवा मधुकर आदमने, ब. नं. ३७६ पोलीस स्टेशन स्टेशन यांनी मदत केली आहे.

# बनावट चलनी नोटा प्रकरणात गुन्हा नोंद, ५० बनावट चलनी नोटा जप्त ३ आरोपींना अटक कळमेश्वर पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन कळमेश्वरः— **मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा आणि श्री सागर खर्डे, सहायक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, सावनेर उपविभाग यांच्या मार्गदर्शनाखाली कळमेश्वर पोलिसांनी बनावट चलनी नोटा प्रकरणात प्रभावी कारवाई करून ५० बनावट चलनी नोटा जप्त केल्या असून, ३ आरोपींना अटक केली आहे.**

दि. २३/०८/२०२६ रोजी कळमेश्वर शहरातील बाजार चौक येथील ईखार वाईन शॉप मध्ये ५०० रुपयांच्या बनावट नोटा देऊन देशी दारूची निप खरेदी करताना **आरोपी क्र. १) दिलीप कुंदीलाल यादव, वय ३९ वर्षे, रा. बंजर वार्ड नं. १३, बमनी, प्राथमिक शाळेजवळ, ता. बमनी, जि. मंडला (म.प्र.) व २) सुनिल अशोक यादव, वय ३२ वर्षे, रा. डोरली छत्रपूर, महाल बाबा चौक, ता. सिवनी, जि. सिवनी (म.प्र.)** हे मजूर दारू पिण्याकरिता सदर दुकानात आले. त्यांनी दुकानातील मॅनेजर नामे नरेन्द्र शंकरराव वालदे, वय ४९ वर्षे, रा. कोलाबा स्वामी देवस्थान, कळमेश्वर (मॅनेजर, ईखार वाईन शॉप) यांना ५००/— रु. ची नोट दिली. मॅनेजर यांनी नोट हातात घेताच त्यांना ती नोट वेगळी वाटू लागली. संशय आल्याने त्यांनी ओरिजनल ५००/— रुपयाच्या च्या नोटेसोबत तुलना केली असता फरक आढळून आला. त्यांनी तात्काळ पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे माहिती दिली. पोलीसांनी घटनास्थळी पोहचुन तात्काळ दोन्ही इसमांना ताब्यात घेतले व त्यांच्याकडून ५००/— रुपयाच्या च्या ७ बनावट नोटा जप्त केल्या. फिर्यादीच्या तोंडी रिपोर्टवरून कलम १७९,१८०,३(५) भान्यासं अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. तपासा दरम्यान दोन्ही आरोपींनी सदरच्या नोटा त्यांचा ठेकेदार परमलाल मालवी याने दिल्याचे सांगितले. त्यावरून **आरोपी क्र. ३) परमलाल भभुसिंग मालवी, वय २५ वर्षे, रा. वरोडा, ता. कळमेश्वर, जि. नागपूर (ठेकेदार)** यास ताब्यात घेवुन विचारपुस करून अंगझडती घेतली असता त्याच्या **ताब्यात ५००/— रुपयाच्या ४३ बनावट चलनी नोटा मिळुन** आल्या. सदर गुन्हयात वर नमुद तिन आरोपी यांना अटक करण्यात आले आहे. सदर प्रकरणाचा सखोल तपास कळमेश्वर पोलीस करीत आहेत.

# पोलीस असल्याची बतावणी करून सोन्याचे दागिने पळविणारे ३ आरोपी निष्पन्न
# ०२ लाख ०५ हजारांचा मुद्देमाल जप्त
# उमरेड पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन उमरेड:—** मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा ,श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री मयंक माधव, सहा पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, उमरेड उपविभाग यांच्या मार्गदर्शनात उमरेड पोलीसांनी पोलीस असल्याची बतावणी करून सोन्याचे दागिने लुटणाऱ्या इराणी टोळीला निष्पन्न करून एकुण २,०५,०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. दोन गुन्हे उघडकीस आणले आहे.

पोलीस स्टेशन उमरेड अंतर्गत फिर्यादी यांनी तक्रार दिली की, दिनांक ०२/०६/२०२६ रोजी उमरेड हद्दीतील मोहपा रोड आणि गजानन टेकडी रोड परिसर येथे दोन अज्ञात दुचाकीस्वारांनी फिर्यादीला थांबवले. ‘‘आम्ही पोलीस आहोत, समोर रस्त्यावर लुटमार होऊ शकते’’ अशी भीती दाखवून अंगावरील दागिने कागदात गुंडाळून ठेवण्यास सांगितले. त्यानंतर फिर्यादीची दिशाभूल करून त्यांच्या गळयातील सोन्याचा गोप व अंगठी चोरून नेले. अशा फिर्यादीचे तोंडी रीपोर्ट वरुन पो.स्टे. उमरेड येथे अपराध क्रमांक ६२५/२६ कलम ३१८(४), ३(५) भान्यासं गुन्हा नोंद आहे. त्यानंतर दिनांक ०७/०८/२०२६ रोजी पुन्हा तशाच प्रकारची दुसरी घटना घडली. शेतातून उमरेडकडे येत असताना मोहपा रोडवर दोन अज्ञात इसमांनी फिर्यादी यांना अडवून पोलीस असल्याची बतावणी केली आणि सोन्याचे दागिने लंपास केले. याप्रकरणी पो. स्टे. उमरेड येथे अप.क्र. ७८३/२०२६ कलम ३१८(४), ३(५) भारतीय न्याय संहिता अन्वये दुसरा गुन्हा नोंदवण्यात आला.

उमरेड पोलीस स्टेशन येथील तपास पथकाने सदर गुन्हयांचा तपास करीत असतांना तांत्रिक पुराव्याच्या विश्लेषण करून तसेच गोपनीय माहितीच्या आधारे तपास करून सदर दोन्ही गुन्ह्यांची पद्धत एकच असल्याने तपासात सदर गुन्हे आरोपी क्र १) तालेब हुसेन इराणी , २) मोहम्मद फिरोज खान, ३) जाफर हबीब बेग तिन्ही रा. शिवाजी नगर परळी वैजनाथ जि. बीड यांनी केल्याचे निष्पन्न केले. उमरेड पोलीसांचे विशेष पथक यांनी

मौजा परळी (वैजनाथ), जि. बीड येथील शिवाजी नगर, इराणी मोहल्ला येथे जावुन आरोपीतांचा शोध घेतला. पोलीस आल्याची चाहूल लागताच आरोपी राहत्या घरातून पळुन गेले. पथकाने प्रसंगावधान राखून आरोपींच्या कुटुंबीयांना विश्वासात घेतले. पंचासमक्ष कायदेशीर घरझडती घेवुन दोन्ही गुन्ह्यातील चोरीस गेलेला ०२ सोन्याच्या अंगठ्या, ०२ सोन्याचे गोप असा एकुण २,०५,०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.



## भिवापूर पोलीसांनी हरवलेल्या ५ वर्षीय बालकाच्या पालकांचा तत्परतेने शोध लावला. बालकाला सुखरूप पालकांच्या स्वाधीन

पोलीस स्टेशन भिवापुर :— मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा, श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा तसेच श्री. मयंक माधव, सहायक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, उमरेड उपविभाग यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सपोनि श्री. रविंद्र मस्कर, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन भिवापूर यांच्या नेतृत्वाखाली सफौ प्रफुल माहुरे, बनं १२०१ आणि पोअं रवि वानखेडे ,बनं ९४६ यांनी तत्परता दाखवत तास बस स्टॉप येथे हरवलेल्या ५ वर्षीय बालकाच्या पालकांचा तत्परतेने शोध लावला. बालकाला सुखरूप पालकांच्या स्वाधीन केले.

दिनांक २५/०८/२०२६ रोजी दुपारी सुमारे ०१:०० वाजता तास बस स्टॉप येथे ५ वर्षीय बालक रडत असल्याची माहीती भिवापुर पोलीसांना प्राप्त झाली. याबाबतची माहिती मिळताच भिवापूर पोलिस तात्काळ घटनास्थळी पोहचले आणि बालकास सुरक्षित ताब्यात घेतले. सदर बालकास त्याचे नाव विचारले असता "कुणाल" एवढीच माहिती सांगता येत होती. त्याशिवाय त्याला घराचा पत्ता किंवा पालकांबाबत कोणतीही माहिती सांगता येत नव्हती. पोलिसांनी बालकाची विचारपूस करून तसेच पोलीस पाटील, तास श्री पुरूषोत्तम दडमल, व स्थानिक नागरिकांच्या मदतीने परिसरात चौकशी सुरू केली. पोलिसांच्या कौशल्यपूर्ण प्रयत्नांमुळे बालकाच्या पालकांचा शोध घेण्यात यश आले. कुणाल यास त्याचे वडील श्री. परदेशी शाहू यांच्या ताब्यात सुखरूप सुपूर्द करण्यात आले.



**प्रतिबंधीत सुगंधित तंबाखुची विक्री करीता साठवणुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद, ८८ हजार ४४० रूपयांचा मूद्देमाल जप्त, काटोल पोलीसांची कामगिरी**

**पोलीस स्टेशन काटोल** :— दिनांक २३/०८/२०२६ रोजी काटोल पोलीसांना गुप्त बातमीदारद्वारे माहिती मिळाली की, पोलीस स्टेशन काटोल हद्दीत व्दारका सिटी बैठक बारचे मागे ता. काटोल येथे आरोपी कुमार राजेद्र सावरकर, वय ३५ वर्ष, रा. व्दारका सिटी काटोल याने त्याचे राहते घरी महाराष्ट्रात प्रतिबंध असलेला सुगंधित तंबाखु पदार्थ विक्री करीता साठा करून ठेवला आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी व्दारका सिटी बैठक बारचे मागे आरोपी **कुमार राजेद्र सावरकर, वय ३५ वर्ष, रा. व्दारका सिटी काटोल** याच्या घराची

पंचासमक्ष घरझडती घेतली असता महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला सुंगधीत तंबाखु मिळुन आला. **पोलीसांनी घटनास्थळावरून पंचासमक्ष वेगवेगळया कंपनीचा प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु एकुण १६१ किलोग्रॅम किंमती एकुण ८८,४४०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

**नमुद आरोपीने सदर प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु मानवी जिवीतास अपायकारक आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने त्याचे उप्तादन, विक्री, साठा व वाहतुकीवर प्रतिबंध लावलेला आहे हे माहीती असतांना सुध्दा प्रतिबंधीत अन्नपदार्थाची विक्री करण्याच्या हेतुने साठा केला होता. आरोपी यांचेविरूद्ध पोस्टे काटोल येथे अन्न सुरक्षा आणि मानके अधि. २००६ सहकलम १२३, २७४, २७५, २२३ भारतीय न्याय संहीता अन्वये गुन्हा नोंद केला आहे.**

## नागपूर ग्रामीण पोलिसांनी राबवली अवैध दारूविरोधात विशेष मोहीम दारूबंदी कायद्यान्वये २३ गुन्हे दाखल

**दिनांक २४/०८/२०२६ रोजी मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री. अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली नागपूर ग्रामीण पोलिसांकडून अवैध दारूविक्री, दारूची साठवणूक करणाऱ्यांविरूद्ध विशेष जनजागृती व अंमलबजावणी मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेदरम्यान नागपूर ग्रामीण जिल्ह्यात दारूबंदी कायद्यान्वये एकूण २३ गुन्हे दाखल करण्यात आले. यामध्ये अवैध दारूविक्री तसेच दारूची वाहतूक करणाऱ्यांविरुद्धही नियमांनुसार कारवाई करण्यात आली आहे.**

**पोलीस स्टेशन मौदा** येथे ०३ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन नरखेड येथे** ४ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन काटोल** येथे १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ०१** गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन उमरेड येथे** ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन पारशिवनी येथे** ३ गुन्हे नोंद. **पोलीस स्टेशन देवलापार येथे** १ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन खापा येथे** २ गुन्हे नोंद. **पोलीस स्टेशन मोहपा येथे** २ गुन्हे नोंद. **पोलीस स्टेशन केळवद येथे** २ गुन्हे नोंद. **पोलीस स्टेशन बेला येथे** १ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे** ०१ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन** बोरी **येथे** ०१ गुन्हा नोंद.

**नमुद कारवाईत एकुण २१८७० मिली देशी दारू, ८६ लिटर मोहाफुल दारू असा एकुण ८८,४००/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

## नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ७११ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक २५/०८/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २४ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ७११ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुट्टीबोरी येथे ३१ आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३० आरोपी अशा एकुण ९१ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ४५ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे २९ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे १९ आणि पोलीस स्टेशन वेलतुर २६ आरोपी पोलीस स्टेशन पाचगाव १३ आरोपी अशा एकुण १३२ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ५५ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ३५ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे १६ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३२ आरोपी, पोलीस स्टेशन मोहपा येथे २० आरोपी अशा एकुण १५८ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३३ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे २० आरोपी पोलीस स्टेशन वडोदा येथे १८ आरोपी अशा एकुण ७१ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ३२ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३२ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे २२ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे २५ आरोपी अशा एकुण १११ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ४३ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ४९ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे २६ आरोपी अशा एकुण १४८ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.






महाराष्ट्र पोलीस
पोलीस स्टेशन
पारशिवनी
फोन नं. : ०७१०२-२२५१२३
SHIELD




मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने